मित्रहो,

अमेरिके मधला फॉल म्हणजे, हेमंत ऋतू, हा एक नयन रम्य अनुभव असतो. उन्हाळ्यातल्या बहरातून थंडीतल्या निष्पर्ण स्थितीत जाण्या आधी वृक्ष राजींनी धारण केलेले विविध रंगी पोशाख म्हणजे फॉल. रंग म्हणजे तरी किती विविध? पिवळा,केशरी, सोनेरी, तांबडा, जांभळा अशी अनेक रंगी उधळण. आपल्या शिरीष, बहावा, गुल मोहोर सारखे सुंदर फुलांनी नटलेले वृक्ष (आणि त्यामुळे येणारे अनेकविध पक्षी) अमेरिकेत नाहीत पण त्यांचं हे एक आगळच सौंदर्य. यावेळी मात्र अमेरिकन फॉल बहरात नव्हता. कदाचित उन्हाळा जास्त प्रखर आणि जास्त वेळ झाल्याचा परिणाम असावा. तरीही काही ठिकाणचं सौंदर्य मोहवून टाकणारं होत. खर म्हणजे या मोसमात सर्व झाडं जवळपास एकदमच रंगीत होतात. आणि दोन तीन आठवड्यात पूर्ण पानगळ होऊन ती निष्पर्ण अवस्थेत उभी असतात. सर्व झाडांच्या तळाशी रंगीत पानांच्या गाद्या तयार होतात तर खूप झाडं एकत्र असली तर रस्त्यावर रंगीत रांगोळी काढल्याचा आभास निर्माण होतो. पण यावेळी काहींची पानगळ, तर काही नुकतेच रंग पांघरायला लागलेले अशी स्थिती होती. जवळपास सर्व झाडं आता उघडी बोडकी झाली आहेत पण तरी कळपातल एखाद कोकरू मागे रेंगाळत रहाव तस एखाद झाड हळूच रंग पालटताना दिसत आहे. अजून पंधरा एक दिवसात मात्र सर्वत्र झाडांचे खराटे उभे राहतील. याचं मात्र मनावर प्रचंड दडपण येत. फॉल मधल्या मनाच्या आनंदी अवस्थेतून अगदी नैराश्याच्या अवस्थेत आपण जातो. त्यानंतर हिमवृष्टीच रूप तर हादरवून सोडणार असत.

आम्ही इथे तात्पुरते निवासी आहोत पण इथे नेहेमीच राहणाऱ्या लोकांना मनाच्या या अवस्थांतून सतत जायचं असत. मग ते येणाऱ्या वसंत ऋतूची डोळ्यात प्राण आणून प्रतीक्षा करत असतात. शेली च्या प्रसिद्ध कवितेतल्या "if winter comes can spring be far behind?" या ओळीतला आशावाद मग लक्षात येतो. असो.

काही फोटो काढले आहेत. खालील पिकासा लिंक वर बघा. आवडले तर सांगा.

नमस्कार.

सुरेश.

http://picasaweb.google.com/sureshnatu/FALL2010?authkey=Gv1sRgCP-L-I6wkOP0Gg&feat=directlink